ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

# शेती व्यवसायामध्ये पीक विमा: एक आर्थिक व मानसिक सक्षमता

**दिघे आर.ए.**

*वाणिज्य विभाग,*

*पी.व्ही.पी.कॉलेज,लोणी.*

**गोषवारा**:

*शेतकऱ्यांना पिकांच्या पेरणीपासून ते पिकांची काढणीपर्यंत सर्व प्रकारच्या नुकसानीची भरपाई मिळण्याची सुविधा आहे. जसे की, वीज पडून पिकांना आग लागणे, चक्रीवादळ, पूर, पिकांवर रोग पसरणे, गारपीट तसेच हवामानामुळे पिकांचे नुकसान झाल्यास नुकसानीची भरपाई मिळते.*

*राज्य सरकारकडून या प्रमुख 3 पीक विमा योजनांबरोबरच शेतकऱ्यांचे विविध कारणांमुळे नुकसान झाल्यास त्यांना आर्थिक सहाय्य करण्याच्या उद्देशाने योजना राबविल्या जात आहेत. प्रधानमंत्री फसल विमा योजना ही भारत सरकार प्रायोजित पीक विमा योजना आहे. हे धोरण 2016 मध्ये लाँच करण्यात आले होते. पिकाचे नुकसान किंवा नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.*

**किवर्ड:** *पीक विमा, आर्थिक सहाय्य, नुकसानीची भरपाई, मानसिक आधार.*

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रस्तावना**:

भारत हा कृषिप्रधान देश आहे 60% पेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. शेतीतून निघणारे उत्पन्न तसेच शेतीपूरक उद्योगांना लागणारा कच्चामाल हा पर्यावरणाशी संबंधित असतो. पर्यावरणात होणारे सततचे बदल व त्यामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीवर मात करण्यासाठी शेतकऱ्याला विविध प्रकारच्या रासायनिक औषधांचा रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्रमाणात करावा लागत आहेत अशा प्रकारे तयार झालेले उत्पादन व शेतीमाल आहाराच्या दृष्टीने घातक होत आहे. त्यामुळे मनुष्याचे आयुर्मान कमी होत असून विविध प्रकारच्या दीर्घ आजारांना सामोरे जाणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. पर्यावरण आणि शेती यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे शेतकऱ्यांनी कोणत्याही प्रकारची पीक घेण्याचे ठरवले किंवा तो घेत असेल तर सगळ्यात मोठा धोका त्याला पर्यावरणापासून जाणवतो. खरंतर पर्यावरणाच्या असंतुलनास मानवी जीवनशैलीच कारणीभूत आहे पण त्याचे

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

आज मोठ्या प्रमाणातले तोटे आपल्याला जाणवत आहेत. अशावेळी या आर्थिक परिस्थितीत पिकलेल्या शेतकऱ्याला एक सामाजिक आणि मानसिक आधार मिळण्याची गरज आहे आणि म्हणून शेतीवर आधारित वेगवेगळ्या प्रकारच्या योजना राज्य सरकार सरकार यांनी निर्माण केल्यात जेणेकरून पर्यावरणातील वातावरणामुळे होणाऱ्या बदलास शेतकरी सक्षमपणे तोंड देऊ शकेल.

भौगोलिक परिस्थितीनुसार वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे पीक घेतले जाते त्याचप्रमाणे उपलब्ध पाण्याची परिस्थिती जमिनीची गुणवत्ता यावरही पिकाचा प्रकार अवलंबून असतो तरीही शेतकऱ्याला पाहिजे तेवढी नैसर्गिक साथ मिळत नाही आणि म्हणून थोड्या प्रमाणात का होईना आर्थिक सहाय्य मानसिक आधार म्हणून शेती विमा कडे पाहिले जाते. शेतीसंबंधीत विम्याचे स्वरूप व्याप्ती विमा हा एक सामाजिक सहकार्याचा उत्कृष्ट आविष्कार आहे मानवी जीवनातील धोके आपण टाळू शकत नाही परंतु त्या धोक्यामुळे निर्माण होणारी नुकसान भरपाई ची व्यवस्था आपल्याला करता येऊ शकते त्यामध्ये आरोग्य विषयक विमा, जनरल बिमा शेती संबंधित विमा, अपघात विमा असे विविध प्रकारचे विम्याचे प्रकार पाहावयास मिळतात. शेती क्षेत्राचा प्रामुख्याने विचार केला तर फक्त पर्यावरणाचा परिणाम होतो असं नाही बाजारपेठेतील चढ उतार आर्थिक सामाजिक परिस्थिती या सर्वांचाच शेतीच्या उत्पादनावर व बाजारपेठेवर परिणाम होत असतो आणि म्हणून अलीकडे विम्याचे महत्त्व व विमा विषयीची जागरूकता सर्वसामान्य लोकांमध्ये शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढत आहे क्षेत्राच्या विकासासाठी शेतीवर विमा मिळणे ही एक आशादायक बाब ठरली आहे.

पीक विमा म्हणजे काय?

पीक विमा हे उत्पादन समस्यांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान भरून काढण्यासाठी सर्वसमावेशक उत्पन्नावर आधारित धोरण आहे. हे चक्रीवादळ पाऊस आणि पावसाच्या कमतरतेमुळे पेरणीपूर्व आणि काढणीनंतरचे नुकसान कव्हर करते. या नुकसानीमुळे पीक उत्पादनात घट होते, त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम होतो. भारतात, पीक विमा प्रधानमंत्री फसल विमा योजनेच्या स्वरूपात दिला जातो.

प्रधानमंत्री फसल विमा योजना म्हणजे काय?

प्रधानमंत्री फसल विमा योजना ही भारत सरकार प्रायोजित पीक विमा योजना आहे. हे धोरण 2016 मध्ये लॉंच करण्यात आले होते. पिकाचे नुकसान किंवा नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. अशाप्रकारे, यामुळे शेतकऱ्यांचा ताण कमी होण्यास मदत होते आणि त्यांना व्यवसाय म्हणून शेती सुरू ठेवण्यास प्रेरित केले जाते.या योजनेत समाविष्ट असलेल्या जोखमींमध्ये पेरणी किंवा पेरणी रोखणे, काढणीनंतरच्या नुकसानीसह दुष्काळ, पूर, भूस्खलन, इत्यादि टाळता न येण्याजोग्या जोखमींमुळे उभ्या पिकाचे नुकसान यांचा समावेश होतो. ही पॉलिसी एसबीआय जनरल इन्शुरन्स आणि एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स सारख्या निवडक विमा कंपन्यांमधून खरेदी केली जाऊ शकते.

**शेतीच्या दृष्टीने पिकाचे महत्त्व विचारात घेता पुढील मुद्द्यांचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे.:**

1.बचतीस प्रोत्साहन विमा योजनेमुळे केलेली बचत मुदतीपूर्व सहजपणे काढता येत नाही तसेच विम्याचे हप्ते नियमितपणे भरावे लागतात त्यामुळे राष्ट्रीय बचतीत वाढ होऊन

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

वैयक्तिक व्यक्तीला तसेच देशाच्या आर्थिक विकासासाठी मदत होते.

2. रोजगार निर्मिती विमा व्यवसायाची रोजगार निर्मिती क्षमता प्रचंड मोठ्या प्रमाणात असून आज अनेक लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे रोजगार निर्माण झाले आहेत.
3. शेती व्यापार व उद्योगांचा विकास विमा मुळे आर्थिक नुकसानीस सहकार्य मिळत असल्यामुळे शेतीमध्ये सुद्धा विविध प्रकारचे प्रयोग करून शेती विकसित करण्याचा शेतकऱ्याचा प्रयत्न दिसतोय विविध प्रकारच्या फळबागा तसेच आधुनिक पद्धतीचे शेती करण्याकडे कल झाला आहे.
4. शेती व उद्योग व्यवसायात सातत्य शेती आणि उद्योग व्यवसायामध्ये केलेली गुंतवणूक काही प्रमाणात किंवा टक्केवारीत आपल्याला निम्म्याद्वारे परत मिळू शकते हा एक व्यवसाय विश्वास शेतकऱ्याला निर्माण झाल्याने तो शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने वेगवेगळे प्रयोग करून शेती प्रगतिशील कशी करता येईल याकडे विचार करतो आहे.
5. परकीय चरणात वाढ शेतीतून तयार होणारा उत्पादित मान आपल्या देशापुरता मर्यादित न राहता तो निर्यातीसाठी सुद्धा वापरला जाऊ लागला आहे त्यामध्ये सुद्धा विम्या क्षेत्राचे मोठे योगदान पाहायला मिळते.
6. कर्ज मिळण्याची उपलब्धता आधुनिक पद्धतीने पिकवली जाणारी शेती फळ फळांची शेती या प्रकारच्या पीक प्रकारांना बँकही कर्ज देण्यास तयार झाल्या आहेत विम्यासारखं संरक्षण असलेल्या पिकांना तर त्या सहजासहजी कर्ज उपलब्ध करून देतात.
7. ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध झाले विम्याच्या संरक्षणामुळे शेतीमध्ये सक्षमरित्या काम करणाऱ्या शेतकऱ्यांना तरुणांना एक चांगल्या प्रकारचा रोजगार व विम्यासारखी सुरक्षितता मिळत असल्याने शेतीबाबत उदासीनता निर्माण झाली होती त्याऐवजी एक उत्साहवर्धक वातावरण पहावयास मिळते.

शेती संबंधातील वेगवेगळ्या प्रकारच्या पीक योजना नैसर्गिक आपत्ती कीड आणि रोगामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे आर्थिक नुकसान भरपाई मिळवून देणे हे राज्य सरकार व केंद्र सरकारचे लक्ष झाले आहेत पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीत शेतकऱ्याचे आर्थिक स्थैर्य अबदित राहण्यासाठी शेती संबंधात वेगवेगळ्या प्रकारच्या पिक विमा योजना सुरू केल्या आहेत.

**पीक विमा योजनेची वैशिष्ट्ये:**

1. नैसर्गिक आपत्ती किड आणि रोगासारख्या प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकाचे नुकसान झाल्यास त्या शेतकऱ्याला विमा संरक्षण देणे.
2. पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्याचे आर्थिक स्थैर्य स्थिरता कशी अबदित राहील यासाठी प्रयत्न करणे.
3. शेतकऱ्यांना नाविन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे.
4. कृषी क्षेत्र साठीच्या पतपुरवठ्यात सातत्य राखणे जेणेकरून उत्पादनातील जखमीपासून शेतकऱ्याच्या सुरक्षेबरोबरच शेती उत्पादन अन्नसुरक्षा पिकाचे विविध कारण आणि कृषी क्षेत्रातील विकासाला गतिमानता येईल हा हेतू आहे.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

**यासाठी राज्य सरकार व केंद्र सरकारच्या विविध प्रकारच्या योजना आहेत त्या पुढील प्रमाणे:**

राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना उद्देश कमावती व्यक्तीच्या मृत्यूनंतर दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना एक रकमे कुटुंब ला प्रदान करणे पात्रता निकषेखालील कुटुंबातील 18 ते 64 वयोगटातील प्राथमिक कमावती व्यक्तींच्या मृत्यू झाल्यास रुपये एक लाखापर्यंत एक रकमे रक्कम प्रदान करण्यात येईल त्यासाठीची आवश्यक कागदपत्रे संबंधित तालुक्यातील तहसीलदार व त्यासाठी असणारे योजनेचा त्याला लाभ घेता येईल

शेती संबंधातील वेगवेगळ्या पिक विमा योजना पिक विम्याचे प्रकार पिक विमा विम्याचे तीन प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते

1. **मल्टिपल पिक विमा-:** हवामानाशी संबंधित नुकसान जसे की पूर दुष्काळी इत्यादीमुळे उद्भवणाऱ्या जखमेचे व्यवस्थापन करण्यासाठी आर्थिक संरक्षण प्रदान करते.
2. **वास्तविक पिक विमा -:** उत्पादन इतिहास वारा गारपीट कीटक इत्यादी मुळे होणारे नुकसान कव्हर करते कमी उत्पादनासाठी कव्हरेज देखील समाविष्ट आहे अंदाज व वास्तविक यांच्यातील फरकाची नुकसान भरपाई दिली जाते.
3. **पीक महसूल कव्हरेज-:** हे केवळ पीक उत्पादनावर आधारित नाही तर उत्पादनातून मिळणारे एकूण उत्पन्नावर आधारित आहेत पिकांच्या किमतीत घट झाल्यास होणारा फरक या विमा योजनेद्वारे संरक्षित सुरक्षित केला जातो.

भारतातील पिक विमा योजना केंद्र सरकार शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीतून होणाऱ्या नुकसानीतून नुकसान भरपाई मिळावी यासाठी महत्त्वाच्या चार पीक विमा योजना राबवत आहे.

**विविध शेतकरी योजना महाराष्ट्र 2023:**

1) मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना
2) कृषी यांत्रिकीकरण योजना
3) पॉली हाऊस सबसिडी योजना
4) पीएम प्रणाम योजना
5) नमो शेतकरी महा सम्मान निधि योजना
6) राष्ट्रीय कृषी विकास योजना
7) मागेल त्याला शेततळे शेतकरी योजना महाराष्ट्र 2023.
8) मागेल त्याला विहीर योजनाहवामानावर आधारित फळपीक विमा योजना (Weather Based Crop Insurnace Scheme for Fruit Crops) आधारित फळपीक विमा योजना (Weather Based Crop Insurnace Scheme for Fruit Crops)

राज्यातील द्राक्षे, आंबा, डाळिंब, केळी, संत्रे, मोसंबी, पेरु, चिकू, काजू, सिताफळ, स्ट्रॉबेरी आणि लिंबू आदी फळांसाठी हवामानावर आधारित फळपीक विमा योजना राबवली जात आहे. शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत या योजनेचा लाभ दिला जातो. या योजनेचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांना इन्शुरन्सच्या हप्त्यामध्ये 50 टक्के अनुदान दिले जाते. तसेच या योजनेंतर्गत कोणत्या पिकांचा समावेश केला जातो. हे सरकारतर्फे जाहीर केले जाते. त्यानुसार लाभार्थी शेतकऱ्यांना सरकारकडून मदत दिली जाते.

**सर्वसमावेशक पीक विमा योजना (Inclusive Crop Insurance Scheme):**

सरकारने राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी यावर्षीपासून नवीन पीक विमा योजना राबवली जात आहे. या योजनेला सर्वसमावेशक पीक विमा योजना असे नाव दिले गेले

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

आहे. या योजनेंतर्गत सरकार शेतकऱ्यांना अगदी 1 रुपयात पीक विमा योजना देत आहे. शेतकऱ्यांच्या हिश्शाची उर्वरित रक्कम राज्य सरकार भरणार आहे. या योजनेचा लाभ शेतकऱ्यांना केंद्राच्या पीक विमा योजनेच्या पोर्टलवरून घेता येईल.

योजनेंतर्गत शेतकऱ्यांना पिकांच्या पेरणीपासून ते पिकांची काढणीपर्यंत सर्व प्रकारच्या नुकसानीची भरपाई मिळण्याची सुविधा आहे. जसे की, वीज पडून पिकांना आग लागणे, चक्रीवादळ, पूर, पिकांवर रोग पसरणे, गारपीट तसेच हवामानामुळे पिकांचे नुकसान झाल्यास नुकसानीची भरपाई मिळते.

राज्य सरकारकडून या प्रमुख 3 पीक विमा योजनांबरोबरच शेतकऱ्यांचे विविध कारणांमुळे नुकसान झाल्यास त्यांना आर्थिक सहाय्य करण्याच्या उद्देशाने योजना राबविल्या जात आहेत. या योजनांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना (Dr. Babasaheb ambedkar Krishi Swavalamban Yojana), बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (Birsa Munda Krishi Kranti Yojana), महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना (Mahatma Jyotirao Phule Shetkari Karjmukti Yojana), प्रोत्साहनपर लाभ योजना, डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना आणि प्रधानमंत्री किसान मानधन योजना राबवल्या जात आहेत.

**दावा प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे:**

पीक विम्याअंतर्गत दावे करण्यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक असलेली काही प्रमुख कागदपत्रे खाली नमूद केली आहेत:

- योग्यरित्या पूर्ण केलेला दावा फॉर्म
- जमीन नोंदणी कागदपत्रे किंवा जमीन पट्टा क्रमांक
- जमिनीच्या मालकीची कागदपत्रे
- आधार कार्ड
- वैयक्तिक ओळख पुरावा जसे रेशन कार्ड, पॅन कार्ड आणि/किंवा मतदार कार्ड
- बँक खाते तपशील
- पेरणीची घोषणा
- दावा प्रतिपूर्ती फॉर्म किंवा अर्ज फॉर्म
- दावे निकाली काढण्यासाठी लागणारा वेळ
- साधारणपणे, विमा कंपनी हंगामी पिकांसाठी जोखीम कालावधी संपण्यापूर्वी 30-45 दिवसांच्या आत दावा निकाली काढते, जर सर्व आवश्यक कागदपत्रे विमा कंपनीकडे सादर केली गेली असतील.

**भारतात पीक विमा देणाऱ्या काही विमा कंपन्या आहेत:**

- टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- इफको-टोकिओ जनरल इन्शुरन्स
- बजाज अलियान्झ जनरल इन्शुरन्स
- SBI जनरल इन्शुरन्स

**निष्कर्ष:**

रोजगार निर्मिती विमा व्यवसायाची रोजगार निर्मिती क्षमता प्रचंड मोठ्या प्रमाणात असून आज अनेक लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे रोजगार निर्माण झाले आहेत. शेती व्यापार व

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

उद्योगांचा विकास विमा मुळे आर्थिक नुकसानीस सहकार्य मिळत असल्यामुळे शेतीमध्ये सुद्धा विविध प्रकारचे प्रयोग करून शेती विकसित करण्याचा शेतकऱ्याचा प्रयत्न दिसतोय विविध प्रकारच्या फळबागा तसेच आधुनिक पद्धतीचे शेती करण्याकडे कल झाला आहे. शेती व उद्योग व्यवसायात सातत्य शेती आणि उद्योग व्यवसायामध्ये केलेली गुंतवणूक काही प्रमाणात किंवा टक्केवारीत आपल्याला निम्म्याद्वारे परत मिळू शकते हा एक व्यवसाय विश्वास शेतकऱ्याला निर्माण झाल्याने तो शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने वेगवेगळे प्रयोग करून शेती प्रगतिशील कशी करता येईल याकडे विचार करतो आहे.

**संदर्भ सूची -:**


- शेतकरी मासिक २०२३
- कृषीसांखिकी २०२३
- आर्थिक सर्वेक्षण२०२१-२२
- जुलै२०२३ योजना मासिक


***Cite this Article:***

Dighe R. A. (2023). ***शेती व्यवसायामध्ये पीक विमा: एक आर्थिक व मानसिक सक्षमता***. In Electronic International Interdisciplinary Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 289–294). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10464212